# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. २५२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०५/२०१८

**१) सोन्याचे दागीन्यांची चोरी :–**

दिनांक १४/०५/२०१८ चे १२.३० ते १३.०० वाजता दरम्यान सामुहीक विवाह सोहळयात यातील फिर्यादी व त्यांची भाची जेवण – खावण करुन पाण्याचा नळा जवळ पाणी पिण्यास गेली असता गर्दीचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचा गळयातील १ सोन्याचे गोफ वजन १७ ग्रॅम, तसेच भाचीच्या गळयातील एक सोन्याची चंप्पलाकंठी हार वजन २० ग्रॅम असा एकुण ७४,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने असे फिर्यादी श्रीमती उमा गोमाजी देशमुख वय ६५ वर्ष, रा. केसलवाडा/वाघ ता. लाखनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोगे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १४/०५/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये अवैद्यरित्या १ ब्रास रेती किंमती २,०००/–रु. ची भरुन चुलबंद नदीघाटामधुन उत्खन्न करुन चोरीने घेवुन जात असतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक १०/०५/२०१८ चे २३.००ते ११/०५/२०१८ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा मंडपाचे कार्यक्रमाकरीता हनुमान वार्ड वरठी येथे आले असता फिर्यादी यांनी वाहणे गुरुजीचे घरा समोर एमएच ३४ यु ३१५८ निळया रंगाची हिरो होंडा स्पलेन्डर प्लस किंमती ७,०००/–रु. ची पार्कींग करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी प्रतीक दामोधर उरकुडे वय २३ वर्ष, रा. सेंदुरवाफा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) स्विप्ट कार चालकांच्या निष्काळजीपणामुळे एक जखमी :–**

दिनांक ०९/०५/२०१८ चे १६.४६ वाजता दरम्यान यातील फिर्यादी अतुल अंकुश रंगारी वय ३२ वर्ष, रा. गणेशवार्ड साकोली याचे वडील अंकुश गोपाळा रंगारी वय ६३ वर्ष, रा. साकोली हा मोक्षधाम धर्मापुरी येथुन सालकलरिक्सा घेवुन साकोली कडे येत असतांना मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन साकोली लाखांदुर रोडवर कृषी केंद्र जवळ साकोली येथे धडक देवुन फिर्यादीचे वडीलास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याची लेखी तक्रार फिर्यादीने आज रोजी पो. स्टे. ला दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**५) बसच्या धडकेत महिलेचा मृत्यु :–**

दिनांक १४/०५/२०१८ चे १४.४५ ते १४.५० वाजता दरम्यान यातील फिर्यादी भिकाराम लालाजी बागडे वय ७५ वर्ष, रा. सावरी मुरमाडी याची नातीन मृतक वर्षा दिलवर रामटेके वय अंदाजे ३० वर्ष, रा. पालांदुर ही तीची झेड आर दुचाकी क्र. एमएच ३६ डब्लु ३९६६ यामाहा मोपेड गाडीने लाखनी कडुन भंडारा कडे येत असतांना समोरुन लाखनी कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बस ही हयगयीने, निष्काळजीपने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे नातीनचे गाडीला सिंगोरी गाव शिवार एनएच ६ रोड गायधने ढाब्या जवळ धडक दिल्याने अपघात होवुन जागीच मरण पावल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) सार्वजनीक मालमत्ता विदृपीकरण केल्याने गुन्हा नोंद :–

**अ)** दिनांक १४/०५/२०१८ चे १९.३२ वाजता दरम्यान यातील फिर्यादी पृथ्वीराज विठ्ठल अहीर वय ३८ वर्ष, रा. खोकरला तलाठी यांनी फिरते पथ क्र. २ भंडारा गोंदिया लोकसभा पोट निवडणुक २०१८ आचार संहीता असल्याने पो.स्टे. भंडारा शहरात पथकासह पेट्रोलींग करीत असतांना शास्त्री चौक भंडारा येथे शास्त्री विद्यालयाचे कंपाऊड वॉल लगतच्या लोखंडी खांबावर प्रधान मंत्री सहज बिजली हरहर योजनेचे फलक आढळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ सार्वजनीक मालमत्ता विदृपीकरण प्रती कायदा १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १४/०५/२०१८ चे १९.५४ वाजता दरम्यान यातील फिर्यादी सतीश गंगाधर आकनुरवार वय ४६ वर्ष, रा. मंडळ अधिकारी भंडारा यानी फिरते पथ क्र. २ भंडारा गोंदिया लोकसभा पोट निवडणुक २०१८ आचार संहीता असल्याने पो.स्टे. भंडारा शहरात पथकासह पेट्रोलींग करीत असतांना कस्तुरबा गांधी वार्ड बजाज मोटार सायकल शोरुम समोरील नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर प्रधान मंत्री नरेन्द्र मोदी यांचे छायाचित्र असलेले सौभाग्य योजनेचे अंदाजे १५–१० लांबी रुदीचा बॅनर लोखंडी खांबावर बांधलेला आढळुन आल्याने फिर्यादी याचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३ सार्वजनीक मालमत्ता विदृपीकरण प्रती कायदा १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**७) भांडण व शिवीगाळ करुन काठीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०५/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रमेश देवाजी आकरे वय ६२ वर्ष, रा. कान्हाळगाव ह. मु. रोशन नगर पवनी हा रोशन नगर पवनी येथुन कान्हाळगाव येथे बबन रामटेके याचे मुलाचे लग्ना करीता गेले होते लग्न लावुन गावाकडे परतीला निघाले असतांना यातील आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन तुने माझ्या भितीला लागुन आपला सामान का ठेवलास? असे म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करुन शिवीगाळ केली व फिर्यादी बोलला असता आरोपीने त्यास थापड–बुक्यांने मारपीट करुन काठीने पायाचे डाव्या पोटरीवर मारुन फॅक्चर केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व एक्सरे–रे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२५,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०५/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष, ही माहालपे बहीण वय १८ वर्ष, ६ महीने हीचे सोबत कपडे दुरुस्ती साठी जाते म्हणुन घरुन निघुन गेली तीचा शोध घेतला असता मिळुन आली नाही तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेले असावे असा संशय असल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**१०) अवैध हातभट्टी / देशी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १४/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, गोबरवाही व साकोली येथे अवैध हातभट्टी / देशी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४१७ लिटर हातभंट्टी दारू+१७६५ किलो सडवा + साहित्य किंमती १,३२,१००/–रु. १०६ लिटर २०० मिली लिटर देशी दारु + १ चार चाकी गाडी किंमती १,७७,१३०/–रु. तसेच असा एकुण किंमती ३,०९,२३०/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.